"Umbartha"
Nirmala Sathye




आज सखूबाई आली तीच मुळी खुषीत दिसत होती. म्हटलं "काय सखूबाई आज अगदी खुषीत आहेस, काय झालाय् काय एवढं ?"

'अवो, बाय व्हायच्य काय – तसंच कारन हाय बगा, माझ्या शेवंताला हवं नुकं व्हायला लागलाय्. लवकरच आजी व्हनार बगा मी" इति सखूबाई.

"अगं पण शेवंता यंदा मॅट्रिकच्या परीक्षेला बसणार होती ना ? मग आता कसं ग जमणार तिला ? तरी मी बजावलं होतं तुला, तिची परीक्षा होऊ दे, तिला कुठेतरी काम लावून देऊ, तर तू लग्नाची घाई केलीस– मारे म्हणत होतीस, 'बाई पोरगा चांगला आहे, मागणी घातलाय् त्यानं, आमच्यांत पुन्ना असलं स्थळ मिळणार नाही, लगीन झाल्यावर बी मस शिकल की ती – आणि आतां संपलं का सगळं." मला ही जरा रागच आला होता. अहो किती हिला समजावून सांगितलं तरी –

"अव बाई, शिक्साण काय पोरीच्या जातीला इतकं महत्त्वाचं नाय्. पर येलीवर फूल उमललं नाय आन् बाई मूल झाल नाय तर काय उपेग हो जन्माचा ? म्याच तिला सांगितलं बाय गो हृयो बघ आपलं जलम् बायामानसाचा, पोर झाल्याबिगार काय खरं नाय – तवा पयल्यांदा पालना हालू दे, मंग वसा तुमचं शिक्सान फिक्सान करत. आन् शिकूनसान तरी काय मोठी नौकरी मिळणार हाय अन्काय ?"

बाकी ही काही एकटचा सखूबाईचीच गोष्ट नाही. आवती-भोवती नजर टाकलीत तरी अशाच अनेक जणी दिसतील तुम्हाला. मूल होत नाही म्हणून डॉक्टरी उपाय करणाऱ्यांपासून ते उपासतापास, अंगारे धुपारे लावत बसणाऱ्या, 'मूल होणं' ह्या एकाच गोष्टीत स्त्री जन्माचे सार्थक समजाणाऱ्या, अशिक्षित अडाणी बाईपासून ते सुशिक्षित, मोठे अधिकारपद भूषविणाऱ्या विदुषीपर्यंत. नुसती अपत्यप्राप्तीच नव्हे तर मुलगाच व्हायला हवा म्हणून झिजणाऱ्या, सहा मुलींच्या पाठीवर मुलासाठी पुन्हा बाळंतपण स्वीकारणाऱ्या, कितीही अडचणी असल्या, शारीरिक दुर्बलता असली तरी मुलासाठी – मूल होण्यासाठी आसुसलेल्या स्त्रिया आपण सर्रास सगळीकडे बघत असतो.

## मातृत्वाची सामाजिक गरज

स्वतःचं 'मूल' असणं ह्या गोष्टीत आनंद, सुख जरूर आहे. पण मूल होणं, माता बनणं हेच स्त्रीजन्माचे एकमेव कार्य आहे का ? ज्या स्त्रीला मूल होत नाही तिला कमी लेखण्याची वृत्ती जी समाजात दिसते, ती बरोबर आहे का ? स्त्रीच्या 'माता' होण्याला इतकं महत्त्व का बरं दिलं गेलं असावं ? स्त्रीला आदिमाता, आदिशक्ती का म्हटलं असावं ? "स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंतकालची माता" वगैरे सुभाषिते का बरं निर्माण झाली असावीत ?

नवीन 'मानव-मनुष्यप्राणी' जन्माला घालण्याचे नैसर्गिक काम स्त्रीला करावे लागते. निसर्गाने ही जबाबदारी स्त्रीवर सोपवली आहे. जेव्हा मानवप्राणी रानटी अवस्थेत होता, टोळी करून राहात होता तेव्हा त्याला अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागत असे. वादळवारा, पाऊस, पूरपाणी, रानातील वणवे आणि हिंस्र श्वापदे ह्यांपासून रक्षण करण्याची त्याची साधने मर्यादित होती. त्यामुळे अर्थातच टोळीतील संख्याबळ हेच अतिशय महत्त्वाचे ठरत असे. स्वरक्षणाची साधने अल्प आणि कमी ताकदीची असल्याने हानीपण खूपच होत असे. साहजिकच मुलाला जन्म देऊन, टोळीतील संख्याबल वाढविणाऱ्या स्त्रीकडे आदराने बघितले जात असावे.

मूल जन्माला येण्याच्या काळात स्त्री शारीरिकदृष्टचा नाजूक बनते. त्यामुळे कमी शारीरिक श्रमाची कामे स्त्रीकडे आली. तिने आपल्याला जन्म द्यावा व त्याबरोबर फळे, कंदमुळे, अग्नीसाठी काटक्या गोळा कराव्या,

लांना लहानाचे मोठे करावे, पुरुषांनी शिकार करून णलेले मांस शिजवावे अशी स्त्री व पुरुष यांच्या गमांमध्ये विभागणी झाली. पुढे शोध लागला की मिनीत पेरलेले पुन्हा उगवते आणि शेती व्यवसाय मूळ रू लागला. हळूहळू समाज स्थिरावू लागला. एकेक वे शोध लागू लागले आणि शेती, पशुपालन करून गणूस स्वतःच्या जरुरापेक्षा अधिक उत्पादन करू गगला. आणि ह्यांतूनच 'माझी मालकी', माझ्या गलकीची वस्तू ह्या कल्पना मूळ धरू लागल्या. मालक गणि चाकर असे दोन भाग पडले. दोन जमातींत युद्ध गल्यास जी जमात जिंकेल ती मालक ठरू लागली. पण जकलेल्या लोकांना कामाला, शेतीला लावून जेते कष्ट न करता खाऊ लागले.

कष्ट न करता राहणारा जो मालक वर्ग होता त्याला गटू लागले की माझ्या मागे माझ्या संपत्तीला वारस कोण ? तो माझाच मुलगा असला पाहिजे. माझ्याच रक्ताचा वारस पाहिजे. मग हा वारस मला कोण देईल ? तर माझी बायको. तिला होणारे माझे मूल हाच माझ्या संपत्तीचा वारस असेल. आणि मग साहजिकच जी बायको मला मूल देत नाही तिचा काय उपयोग ? तेव्हा स्त्रीला मूल होणे हेच स्त्रीच्या आयुष्याचे एकमेव उद्दिष्ट बनले.

## मातृत्वाचे स्तोम

स्त्रीकडे मूल (वारस) जन्माला घालण्याचे साधन म्हणून बघितले जाऊ लागले. आणि उच्चवर्गीयात वंशशुद्धतेच्या नावाखाली घराच्या चार भिंतींच्या आत तिला बंदिस्त करण्यात आले. मुलांना जन्म देणे आणि वाढविणे एवढेच तिचे जीवितकार्य. त्यापलीकडे समाजाच्या व्यवहारात तिला स्थान नव्हते. पुरुष आपल्याजवळील संपत्तीचा विनियोग कसा करायचा ते ठरवत असे. असलेल्या संपत्तीवर स्त्रीचा अजिबात हक्क नव्हता. ती सर्व संपत्ती तिच्या मुलाला मिळत असे. साहजिक 'मुलगा' नसणाऱ्या स्त्रीला पतीच्यामागे संपत्तीवर हक्क सांगता येत नसे. म्हणून मूल नव्हे तर मुलगा होणे ह्या गोष्टीला अत्यंत महत्त्व आले.

अर्थात कष्टकरी वर्गातील स्त्री उत्पादनाच्या कामात भाग घेत असे. आपल्या पुरुषाला बरोबरीने मदत करीत असे. परंतु तरीसुद्धा निर्माण केलेल्या वस्तूवर तिचा हक्क नसे. समाजातील संपन्न मालक वर्गाचे अनुकरण हा वर्गपण करीत असे. त्यामुळे माता होणे व आपल्या पुरुषाचा वंश चालू ठेवणे ह्या गोष्टींना समाजात अतोनात महत्त्व आले. आणि 'चूल व मूल' देथ पर्यंत स्त्रीचे क्षेत्र मर्यादित झाले.

सामाजिक व्यवहारातील सर्व अधिकार गमावलेल्या स्त्रीला तिच्या दुःखावर मलमपट्टी म्हणून आणि तिच्यावर सोपवलेली मातेची भूमिका तिने न कुरकुरता पार पाडावी म्हणून तिला 'मातृदैवत' बनविले गेले. आणि मग जणू काय निसर्गतःच ती ज्ञान मिळविण्यास, इतर कामे करण्यास असमर्थ आहे असे सांगितले गेले. स्त्रीने घरात राहून आपली सेवा करावी, मुले संभाळावी, पडेल ते काम निमूट करावे म्हणून तिला अबला ठरविण्यात आले. तिच्या मातृत्वाचा पोकळ गौरव करण्यात आला. "जिचे हाती पाळण्याची दोरी तीच जगाते उद्धरी" म्हणून तिची खोटी स्तुती करण्यात आली. दैवत म्हणून तिला देव्हाऱ्यात बसवून नैवेद्याकडे नुसती नजर टाकून संतुष्ट राहावे लागू लागले.

आपली मातेची भूमिका श्रेष्ठ आहे असे भासावे म्हणून पुत्रवती स्त्री भूषण ठरू लागली. पुत्रवती स्त्री मग ती बुद्धीने कमी का असेना, मोठी भाग्यवती समजली जाऊ लागली. शुभ कार्याला बाहेर पडताना पुत्रवतीचे दर्शन भाग्य समजले जाऊ लागले, तर निपुत्रिक स्त्रीच्या हातचे तर पाणी पण ऋषीमुनींना चालत नसे. मातृत्व हे काहीतरी महान मंगल आहे आणि त्याच्या पलिकडे कशाचीच अभिलाषा स्त्रीने धरू नये असेच वातावरण समाजात होते.

## नवे शोध, नव्या जाणिवा

उत्पादनाच्या साधनात हळूहळू बदल होत होते. छोटे छोटे कारागीर जाऊन त्यांची जागा आता मोठे कारखाने घेऊ लागले. आणि घरात बसून आपल्या नवऱ्याला त्याच्या धंद्यात मदत करणाऱ्या स्त्रीला घराच्या बाहेर मजुरीकरिता पडावे लागले. घराबाहेरचे जग माहीत नसलेली स्त्री समाजात वावरू लागली.

दोन महायुद्धांच्या काळांत सर्व सामाजिक व्यवहार स्त्रियांनी उत्तम रीतीने सांभाळून दाखवले. व्हिएतनाम सारख्या देशात खांद्यावर बंदूक आणि पाठीला मूल बांधून हरतऱ्हेचे कष्ट स्त्रियांनी उपसले

[illegible] शौर्य, धैर्य, बुद्धी, शारीरिक कष्ट करण्याची क्षमता वगैरे कोणत्याच बाबतीत आपण कमी नाही जगभरच्या सर्व स्त्रियांना दाखवून दिले. केवळ माता होण्यासाठीच आपला जन्म नसून आपण इतरही अनेक क्षेत्रांत पराक्रम गाजवू शकतो हे स्त्रीला समजून चुकले. तसेच संततीनियमनाच्या शोधांनी मातृत्व अटळ नसून आपल्या हातातील आहे हा पण समज स्त्रीत आला.

सरंजामशाही राजवटीत कष्टकरी स्त्री श्रम करत होती. पण तिला स्वतःची ओळख नव्हती. पण आज खेड्यातील आदिवासी स्त्री ग्रामपंचायतीची सभासद होऊ शकते. आणि आत्मविश्वासाने बोलू शकते. नव्या युगाने तिला नवे क्षितिज दाखवले आहे. कामगार स्त्री जी फक्त नवऱ्याला मदत करीत होती ती आज स्वतंत्र रीतीने मजुरी करते. आपली युनियन बांधू शकते. आजची उच्च वर्गातील स्त्री शिक्षण घेते–नोकरी करते. स्वतःच्या पायावर उभी राहू शकते. उदरनिर्वाहासाठी नवरा आणि मुलगा ह्यांच्या तोंडाकडे बघण्याची तिला गरज नाही. ह्याचा सगळ्याचा अर्थ असा की पुत्रप्राप्ती हेच तिच्या जीविताचे इतिकर्तव्य नसून त्या व्यतिरिक्त इतर अनेक क्षेत्रांत ती स्वतःचा विकास करून घेऊ शकते. वीरमाता म्हणून स्वतःचा गौरव करून घेण्यापेक्षा ' वीरस्त्री ' म्हणून ती स्वतः पुढे येऊ शकते.

हे सर्व खरे असले तरी अजून समाजाच्या लेखी स्त्री म्हणजे माताच आहे. अजून स्वार्थी समाज तिच्यावरच्या जुन्या अनावश्यक जबाबदाऱ्या कमी करण्यास तयार नाही. लहानपणापासून अजूनही तिच्यावर माता होण्याचे आणि आपल्या पतीच्या आणि मुलांच्या गौरवातच स्वतःचा गौरव मानण्याचे संस्कार केले जातात. नोकरी करणाऱ्या स्त्रीचे मुलांकडे दुर्लक्ष होते असे म्हणून समाज तिला डिवचतो. मूल नसणाऱ्या स्त्रीकडे ' व्यर्थ तुझा जन्म ' ह्याच दृष्टीतून बघितले जाते. एखाद्या मोठ्या कर्माला वाहून घेणाऱ्या स्त्रीने मूल नको म्हटले तर ते अनैसर्गिक समजले जाते.

एकीकडे मातृत्वाचे गोडवे गाता गाता दुसरीकडे मात्र तिला त्यासाठी कोणतीही सवलत नाकारली जाते. मग शेतावर मजुरीसाठी येणारी एखादी स्त्री आपल्या चिमण्या बाळाला झाडाखाली सावलीत ठेवते. त्याला दूध पाजण्यासाठी अवधी द्यायला मुकादम राजी नसतो. बाळंतपणाची रजा द्यावी लागू नये म्हणून विवाहितेला नोकरी देण्याबाबत नाराजी असते. बायकांचा जीव संसारात, मुलाबाळात असं म्हणून तिला वरिष्ठ जागा नाकारली जाते आणि उंबरठ्याच्या बाहेर डोकावून नव्या जगाची चाहूल घेणाऱ्या स्त्रीला पुन्हा एकदा त्या उंबरठ्याच्या आत ढकलण्याचा प्रयत्न केला जातो.

वास्तविक पाहता मुले ही समाजाची संपत्ती आहे. त्यांचे संरक्षण, संवर्धन यांची जबाबदारी साऱ्या समाजाने उचलली पाहिजे आणि स्त्रीला तिच्या विकासाची संधी मिळाली पाहिजे. अर्थात नव्या युगाने स्त्रीला दाखवून दिले आहे की, उंबरठा ओलांडून तू बाहेर पडू शकतेस. आणि पुरुषाच्या बरोबरीने कर्तृत्व गाजवू शकतेस. माता होणे ही तुझी एक नैसर्गिक जबाबदारी आहे. आणि ती सांभाळून तू स्वतःचा विकास करून घेऊ शकतेस. ह्या मानवी समाजाला केवळ माता म्हणूनच नव्हे तर इतरही अनेक प्रकाराने तुझी जरूर आहे. अर्थातच त्यासाठी स्त्रियांनी आधी स्वतःला पटवून दिले पाहिजे की स्त्री ही अनंत कालची माता वगैरे नसून काही क्षणांची माता आणि अनंत कालची एक व्यक्ती समाजाचा एक स्वतंत्र घटक आहे. उंबरठ्याच्या बाहेरील अनंत क्षितिजात भरारी मारण्याचा हक्क प्रत्येक स्त्रीला मिळाला पाहिजे. त्यासाठी एक होऊन आपण झगडले पाहिजे. आणि समाजाचा एक स्वतंत्र घटक म्हणून जगायला शिकले पाहिजे.

वात्सल्य, त्याग, सेवा वगैरे सोनेरी बेड्यांनी स्त्रीला आजवर उंबरठ्याच्या आत जखडले होते पण आता स्त्री त्याच्या बाहेर पडू पाहात आहे. सोनेरी पिंजरा आणि मोत्याच्या चाऱ्यापेक्षा स्वतंत्रतेचा आनंद, सामाजिक कर्तृत्वाचा आनंद अधिक मोलाचा आहे असे काहीसे तिला उमगू लागले आहे.

**––निर्मला साठे**